

# आंदळीच्या माळिणी

बारामतीची दिनांक १५ नोव्हेंबर १९७८ ची शेतमजूर परिषद. तीन हजार स्त्री पुरूषांचा मेळावा. दीड हजार मंडळी महाराष्ट्राच्या इतर कानाकोपऱ्यातून आलेली. दीड हजार मंडळी स्थानिक, बारामतीच्या आसपासच्या शेतमळ्यांवर काम करणारी. बहुसंख्य शेतमजूर, काही थोडे मध्यम शेतकरी. स्वतःच्या शेतावर कष्ट करणारे. तीनहजारांपैकी स्त्रिया जवळ--जवळ सातशे ते आठशे. काही नवऱ्यांच्या बरोबर आलेल्या काही नवऱ्यांच्या शिवाय. आपापल्या भागातील शेत-मजूर चळवळीच्या प्रतिनिधी म्हणून. गावच्या लोकांनी वर्गणी काढली. पैसे जमविले आणि बाया निघाल्या चळवळीच्या कार्यकर्त्याबरोबर. चलो बारामती. पोरा-बाळांची काळजी ? कोणाची सून, कोणाची लेक, कोणाच्या कारभाऱ्यानेच सांगितले 'जा गुमान'. कोणाची शेजारीण उपयोगाला आली. मात्र साधारणपणे मध्यमवयीन बऱ्याच जास्त होत्या. सर्व जातीच्या सर्व धर्मांच्या बाया एकत्र बसल्या होत्या. मजूर म्हणून त्या सर्व एक होत्या. त्या सगळ्यांचे प्रश्न एक होते. सरकारने खूप कायदे केले. ते आमच्या पदरात पडत नाहीत. कायदे अपुरे आहेत. अमलबजावणी नीट नाही. अशा परिस्थितीत आपण काय करायचे ?. मजूरी वाढवून घ्यायची युक्ती काय ? काहींना चळवळीचा अनुभव होता. संघर्ष केल्याशिवाय मजूरी वाढत नाही. संघर्षा-साठी एकजूट पाहिजे आणि एकजूटीसाठी संघटना पाहिजे. हे सगळे त्यांच्या डोक्यात पक्के होते. काहींना मात्र चळवळीचा फारसा अनुभव नव्हता. गावोगावी वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांच्या ज्या संघटना होत्या. उदा० कोतवालांची संघटना, ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांची संघटना, गटविकास सचीवांची संघटना त्याचबरोबर सरकारी शेतांवर राबणाऱ्या कुशल, अकुशल काम करणाऱ्या ग्रामीण मजूरांची संघटना, या संघटनांनी पुढाकार घेऊन आपल्या शेतमजूर बांधवांना माहिती दिली. कायदेशीर मार्गाने तरी किमान वेतन मिळू शकते का याचा प्रयत्न सुरू झाला. अशी अनेक तऱ्हेची कष्टकरी मंडळी आली होती.

सर्वात मोठा एक बायांचा घोळका उठून दिसला म्हणून तिकडे गेले. सगळ्यांच्या डोईवरून पदर आणि कुंकवाची लांबलचक आडवी चिरी. तीस चाळीस जणी होत्या. बसल्या बसल्या मी माझी ओळख करून दिली. आणि मग संभाषणाला सुरुवात केली. बाया बोलायला फारच उत्सूक होत्या. प्रत्येकीला किती सांगू आणि किती नको असे होत होते. प्रत्येकीच्या चेहऱ्यावर करारीपणा होता. फार मोठा आत्मविश्वास कमा-विल्याची ती खूण होती.

"कोणत्या गावच्या तुम्ही ?"

'मान तालुक्यातील 'आंदळी' गावच्या.'

'मजूरी मिळते का ?'

'मजूरी कशाला करू बाई आम्ही. सगळ्या शेतकरणी आहोत. मळे आहेत प्रत्येकीचे.'

'अरे वा, मग सुखासमाधानाने नांदायचे सोडून येथे कोठे आल्यात चळवळीमध्ये ?'

'तुम्हाला आमचा इतिहास माहितच नाही जणु. गेली २५ वर्षे झगडतोय आम्ही आंदली धरणाच्या प्रश्नावरून.'

'धरण झाले की व्हायचंय्?'

'हे बघा, आमच्या जितेपणी ते होणे शक्य नाही.'

'का बरं ! जमिनीला पाणी मिळत असेल तर तुम्ही कशाला अडविता ?'

'बाई, हजार कुटुंबाच्या जमीनी जातील तेव्हा कुठे बाकीच्यांना पाणि मिळेल. आणि आम्हाला सांगा या हजार कुटुंबांनी जायचे कुठे, खायचं काय ?'

'मग जमिनीच्या बदल्यात जमीन मागा. पुनर्वसनाचा कायदा आहेच की.'

'त्याच्याच साठी भांडतोय. कायद्यामध्ये धरणाचे बांधकाम चालू असताना जमीन देण्याची तरतूद नाही. मिळेल चार पाच वर्षांनी जमीन. ती पण कोणती ओसाड जमीन कोणाला ठाऊक !'

'तो पर्यंत तुम्ही काय करावं !'

'फिरावं या मालकाकडून त्या मालकाकडे निर्वासितावाणी. तीच तर आमची मागणी आहे. शेताला शेत, विहीरीला विहीर मिळालीच पाहिजे. आता आधी.'

'किती वर्ष झगडा चाललाय ?'

'गेली २५ वर्ष एक पिढी गेली निघून या झगडयामधून.'

'पुरुषांना करू द्या झगडा. तुम्हा बायांचे काय काम आहे यामध्ये ?' मी मुद्दाम डिवचायला विचारलं.

बाया लगेच कडाडून पुढे आल्या.

'आम्ही बायांनीच कंबर कसली म्हणून एवढे वर्ष टिकून राह्यलाय हा झगडा. सरकारची हिंमत झाली नाही मातीला कुदळ लावायची. खरं म्हणजे आम्ही माळ्याच्या बायका. गोश्यात रहायची आधी. आपल्या शेतावर काम करावे आणि डोक्यावर पदर ओढून घरी जावे. ही चिरी माळी समाजातील स्त्रियांचे वैशिष्ठ्य. पण पोराबाळांच्या पोटाचा घासच जायची पाळी आली तेव्हा ठरविले, चालीरीती गेल्या खड्डयात. पहिल्यांदा जेव्हा धरणाच्या कामास सुरूवात व्हायची होती त्या भूमीपूजनाच्या दिवशीच मंत्र्यांच्या हातची कुदळ धरली वरच्यावर. पोलिसांचे कडे तोडले. पुरुषमंडळींना सांगितले तुम्ही रहा मागे. बायामंडळी राहू पुढे. बघू कोणता पोलीस [illegible] लावतो.'

'जुनी हकीगत सांगता सांगता सगळ्यांचे चेहरे अगदी फुलून आले होते. कोणी साठीला पोचलेली, कोणी पन्नाशीची. सगळ्या मध्यम वय उलटून गलल्या बाया. एकजण सांगायला लागली,

'परवा पुन्हा जमीनीची मोजमाप घ्यायला आली होती सरकारी माणसं. आम्ही कांद्यांची रोपे लावत होतो. साफ बजावलं, आमच्या जमीनीत पाय टाकायचा नाही. आमचे पीक गेले तर भरून कोन देईल!'

'बाई, अजून सरकारी माणसं आमच्या भागात यायला घाबरतात. भक्कम एकजूट झालीय आमची. एक बाई घरी रहात नाही.'

'जातीमुळे फूट पडते का ! महार समाजातील लोक आहेत का तुमच्या बरोबर ?'

'महारांच्याकडे जमीनीच नाहीत. फक्त दोघांच्याच कडे आहेत. ते असतातच आमच्याबरोबर.'

'आणि शेतावर कामाला मजूर ठेवता का तुम्ही ?'

'ठेवतो पण मधनं अधनं. आम्ही त्यांच्या बरोबर काम करत असतोच.'

'आणि त्यांना मजूरी किती देता ?'

'अडीच रूपये.'

'पण सरकारी कायदा होता तीन रुपयांचा. आणि आता बागाईत भागात पाच रूपयांचा कायदा आहे.'

'काय बाई, आमच्या भागात तोच दर आहे. आमच्या शेजारी एक मारवाडी मळेवाला आहे. तो तीन रुपये देतो. पण सक्ती करतो, सगळा माल

त्याच्याच दुकानातून घेतला पाहिजे. वाण्याचे सामान कापडचोपड. आणि त्यात पैसे खातो.'

या बायांच्या लढाऊपणामुळे मला जरा स्फूर्ती आली. त्यांना स्त्रीमुक्तीची जाणीव थोडीशी द्यावी असे वाटायला लागले. सुरवात केली.

"हुंडा देता की नाही ?"

"हुंडा द्यावा लागतो. दहा हजाराच्याखाली लग्न होत नाही." सर्वांनी दुजोरा दिला. अमक्याने किती तमक्याने किती दिला याची यादी वाचली गेली. एकाच्या मुलीचे लग्न पैसे नाही म्हणून अडून बसले होते. ती म्हणाली, "आमच्या जमिनी वांध्यात असल्यामुळे मळयाची जमीन असूनही विकता येत नाही की कर्ज काढता येत नाही."

"हे सगळे तुम्हाला पटते का ?"

"नाही नं पटत. हुंडापद्धती एकदम वाईट आहे. पण रीत पडली. रिवाज कसा मोडायचा?" सगळयाजणींचे चेहरे गंभीर झाले होते. "आता बघा, जग बदलत चाललंय्. स्वतःचे अनुभव लक्षात घ्यावे. गोशात रहाणाऱ्या तुम्हाला बाहेर येऊन चळवळ करावीच लागली ना ! रिवाज सोडला की नाही ! तसेच या हूंड्याच्या बाबतीत करायचं. बायांनीच पुढाकार घ्यायचा. एरवी चळवळी करता, पोटाला चिमटा बसला की पुढे येता. तशी हुंडा पद्धतही पोटाला चिमटा घेणारीच नाही तर काय ? बायांची संघटना करा आणि कायदा करा हुंडा घ्यायचा नाही. सामुदायिक लग्ने करायची व गावजेवण घालायचं. जमेल का ?"

"एकदम कसं जमायचं. पण विचार केला पाहिजे. तुम्ही म्हणताय ते खरं आहे !" सगळ्यांचे चेहरे विचारात बुडून गेले होते.

माझ्या लक्षात आलं, आर्थिक चळवळीसाठी बाहेर पडलेल्या माळी समाजातील या शेतकरणी. एरवी हुंड्याचा विषय काढला तर त्यांनी मला बोलूच दिले नसते. पण चळवळीमुळे त्यांच्यामध्ये विचार करायची ताकद उत्पन्न झाली हेही नसे थोडके ! शेवटी शिक्षणाने जे साध्य होत नाही ते अनुभवातून मिळते, झगड्यातून मिळते हेच खरे !

**–छाया दातार**

---

## मनोर पोलिस स्टेशनला वारल्यांचा घेराव

ठाणे, दि. १५– (लो. प्र.) गुन्ह्याशी काहीही संबंध नसताना मारझोड करणे, कोठडीत डांबणे, लाचलुचपत वगैरे छळाबद्दल पोलिसांचा निषेध करण्यासाठी मनोर परिसरातील अनेक गावातील शेकडो आदिवासींनी आदिवासी नेते व भूमीसेनेचे एक कार्यकर्ते श्री. काळुराम धोदडे यांच्या नेतृत्वाखाली मनोर पोलिस स्टेशनवर एक मोर्चा गेला होता. इतकेच नव्हेतर पोलिस स्टेशनला घेरावा घातला होता. श्री. धोदडे यांनी पोलिसांविरुद्ध असलेल्या आरोपाचे एक निवेदन डी. वाय. एस. पी. श्री रविंद्र गुप्ता यांना दिले.

श्री. गुप्ता यांना दिलेल्या निवेदनात कॉन्स्टेबल श्री. बुरसे व श्री. गरुड यांनी गुन्ह्याशी काहीही संबंध नसलेले आदिवासी तरूण श्री. जीवन्दर कान्हात, श्री. देवू सांबरे, श्री. बापू पारधी यांना दि. ६ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर पर्यंत ३ दिवस पोलिस कोठडीत ठेवून मारहाण केल्याबाबत तसेच कॉन्स्टेबल श्री. गायककाड यांनी डेकाळे येथील श्री. महेश नारगोळकर यांचेकडून ५०० रूपये लाच घेतल्याबाबत व दि. १० सप्टेंबर ७८ रोजो सावकारांनी चार आदिवासींना मारहाण केल्याबाबतची तक्रार नोंदवून घेण्यास मनोर पोलीस स्टेशनमधील पोलिसांनी नकार दिल्याबाबत आरोप करण्यात आलेले आहेत. तसेच पोलिसांच्या वागणुकीबाबतच्या इतर अनेक तक्रारी लोकांनी ह्यावेळी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष सांगितल्या.

ह्यावेळी सर्व लोकांनी पोलीसस्टेशनला घेराव करून संबंधितांविरूद्ध जागीच कारवाई केल्याशिवाय जाणार नाही असे अधिकाऱ्यांना सांगितले. श्री. गुप्ता यांनी त्याप्रमाणे प्राथमिक चौकशी केली असता लोकांनी केलेले आरोप खरे असावे असे त्यांना आढळून आले. त्याचप्रमाणे संबंधीतांविरुद्ध लवकरात लवकर कारवाई केली जाईल असे आश्वासन श्री. गुप्ता यांनी दिले.

– लोकसत्ता, १६-९-१९७८